# रस्ते हळूहळू पूर्वपदावर

## भूमिगत मेट्रोमुळे होते बंद; तीन स्थानक परिसरांतील वाहतूक सुरळीत

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भूमिगत मेट्रो-३च्या कामासाठी अनेक ठिकाणी रस्ते बंद ठेवण्यात आले आहेत, तर काही ठिकाणी रस्त्यांवर मर्यादा आहेत. हे रस्ते आता झपाट्याने मोकळे व सुरळीत होण्यास सुरुवात झाली आहे. यापैकी तीन स्थानक परिसरांतील रस्ते पूर्ववत झाले आहेत.

'कुलाबा-वांद्रे-सीप्झ' ही ३२.५ किमी लांबीची राज्यातील पहिली भूमिगत मार्गिका आहे. या मेट्रोवरील स्थानकांची उभारणी जमिनीच्या खाली सुमारे २० मीटर खोलीवर सुरू आहे. या कामासाठी त्यावरील रस्ता खोदावा लागला. त्यासाठीच अनेक रस्ते एकतर बंद आहेत, किंवा त्यावर तात्पुरते लोखंडी आच्छादन बसविण्यात आले आहे. जमिनीखाली हे काम सुरू असल्यानेच अनेक रस्ते अरुंद झाले आहेत. या मार्गिकेची उभारणी झपाट्याने पूर्णत्वाकडे जात असल्याने रस्ते मोकळे करण्यास सुरुवात झाली आहे.

मेट्रो-३चा पहिला टप्पा सारीपूतनगर (आरे) ते बीकेसी असा असून, तो डिसेंबर २०२३पासून सुरू होणार आहे. त्यामुळे या टप्प्यातील स्थानकांच्या डोक्यावरील रस्ते पूर्ववत करण्यास सुरुवात झाली आहे. हा मेट्रो प्रकल्प उभ्या करणाऱ्या मुंबई महानगर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडनुसार (एमएमआरसीएल) तयार असलेल्या एमआयडीसी, मरोळ नाका आणि सीप्झ या स्थानकांच्या डोक्यावरील रस्ते पूर्ववत करण्यात आले आहेत. त्यानंतर आता बीकेसी, विद्यानगरी व धारावी स्थानकांच्या डोक्यावरील रस्ते पूर्ववत होत आहेत. या पहिल्या टप्प्यातील सर्व रस्ते जून २०२३पर्यंत पूर्वपदावर येणार आहेत.

मेट्रो-३साठी सप्टेंबर २०१६पासून रस्ते बंद करण्यास सुरुवात झाली होती. डिसेंबर २०२३मध्ये पहिला टप्पा सुरू झाला की, दुसरा टप्पा (बीकेसी दक्षिण ते कफ परेड) डिसेंबर २०२४ मध्ये सुरू होणार आहे. त्यासाठी जून २०२४पर्यंत रस्ते पूर्ववत केले जाणार आहेत.

- 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ'वरील स्थानकांची उभारणी जमिनीखाली २० मीटरवर
- या कामासाठी रस्ते बंद किंवा त्यावर तात्पुरते लोखंडी आच्छादन
- बीकेसी, विद्यानगरी व धारावी स्थानकांवरील रस्ते पूर्ववत



### भुयारीकरण पूर्ण होणे महत्त्वाचे!

या प्रकल्पाचा सर्वाधिक महत्त्वाचा भाग भुयारीकरणाचा आहे. ते 'एमएमआरसीएल'ने २०२२मध्येच १०० टक्के पूर्ण केले. दोन्ही टप्प्यांचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यातील स्थानकांची उभारणी सरासरी ९० टक्के व अन्य पायाभूत सुविधा ८५ टक्के पूर्ण झाल्या आहेत. आरे, सीप्झ, एमआयडीसी व मरोळ या चार स्थानकांची उभारणी ९५ टक्क्यांहून अधिक पूर्ण झाली आहे. दुसऱ्या टप्प्यातील स्थानकांची उभारणी ७५ टक्के पूर्ण झाली असून, तेथील रस्ते सुरळीत करणेदेखील सुरू झाले आहे.

### पहिल्या टप्प्यात १० स्थानके

मेट्रो ३च्या पहिल्या टप्प्यात आरे, सीप्झ, एमआयडीसी, मरोळ, विमानतळ टर्मिनल १, सहार रस्ता, टर्मिनल २, सांताक्रुझ, विद्यानगरी व बीकेसी अशा १० स्थानकांचा समावेश असेल. या सर्व भागांतील रस्ते जून २०२३पर्यंत पूर्ववत होणार आहेत.